# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक २४.०४.२०२६ शुक्रवार**

**१) गुन्हेशाखा घरफोडी विरोधी पथकाची कामगिरी :— क्रिकेट सामन्यावर जुगार खेळणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २३.०४.२०२६ चे २१.३० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा घरफोडी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे सदर हद्दीत, सदर बाजार, अमर सज्जन अपार्टमेंट, एम.एस.ई.बी. ऑफीस जवळ, फ्लॅट क्र. ३०२ येथे काही ईसम मुंबई इंडीयन विरूध्द चेन्नई सुपर किंग या आयपीएलच्या क्रिकेट सामन्यावर लोकांकडून पैसे घेऊन, क्रिकेट सट्टा चालवत आहे. अशा माहितीवरून नमुद ठिकाणी पंचासमक्ष जावुन, सापळा रचुन, रेड कारवाई केली असता, तेथे आरोपी क्र. १) हर्षल देवेंद्र देवघरे, वय २४ वर्षे, रा. तांडापेठ, बिनकर कॉलनी, बोधराज बोरकर चे घरी किरायाने, पाचपावली, नागपूर २) अभयसिंग बलिरामसिंग ठाकूर, वय ३२ वर्षे, रा. लाडगंज थाना, श्याम बेंडगली, बलदेवार, जबलपूर (म.प्र.) ३) प्रभात उर्फ भुरु प्रभाकर पाठराबे, वय ३२ वर्षे, रा. करंजीकर लाईन, तबला मार्केट, बोहरा बस्ती, इतवारी, नागपूर, ह.मु.— अमर सज्जन अपार्टमेंट, एम.एस.ई.बी. ऑफीस जवळ, फ्लॅट क्र. ३०२, सदर, नागपूर ४) मोवेश सय्यद वल्द सय्यद मेहबुब, वय २२ वर्षे, रा. शांतीनगर, स्मशानघाट मागे, शंकर स्टोअर्स जवळ, नागपूर ५) अब्दुल अयान अब्दुल लतीफ खान, वय २२ वर्षे, रा. सेवासदन चौक, पिवळ्या शाळेच्या मागे, फायर ऑफीस जवळ, गणेशपेठ, नागपूर ६) हमीद रजा मोहम्मद बशीर, वय २५ वर्षे, रा. बडी मस्जिद, संतरंजीपूरा, भंडारा रोड, लकडगज, नागपुर ७) अब्दुल तनवीर अब्दुल मजीद, वय २९ वर्षे, रा. गांजाखेत, हमजापुरी रोड, नमक फॅक्ट्री जवळ, तहसील, नागपूर हे संगनमताने इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा वापर करुन ग्राहकांकडुन आयपीएल क्रिकेट सामन्यावर सट्टयाची खायवडी करतांना समक्ष मिळुन आले. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता लोकांसोबत अप्रामाणिकपणे आर्थिक व्यवहार करुन, प्रतिबंधीत असलेल्या अवैध लिंकचा वापर करुन क्रिकेट बेटींग करतांना मिळून आले. आरोपींचे ताब्यातुन ०१ लॅपटॉप, ०१ लॉगबुक, वेगवेगळ्या कंपनीचे ०५ मोबाईल फोन तसेच, ईतर ईलेक्ट्रॉनिक साहीत्य असा एकुण किंमती अंदाजे २,३३,६००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे सदर कलम ३१८(४) भा.न्या.सं. सहकलम कलम ४, ५ म.जु.का., सहकलम ६६(डी) आय.टी. ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल केलेला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. दिलीप चंदन, सपोनि. नितीन चुलपार, पोहवा. विजय शिंदे, विजेंद्र, गणेश, किशोर, पोअं. राहुल व चापोअं. सुधीर यांनी केली.

## २) अजनी पोलीसांची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत.

दिनांक २४.०४.२०२६ चे ०५.१५ वा. ते ०७.१५ वा. चे दरम्यान, अजनी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना माहिती मिळाली की, शताब्दी चौक, अजनी येथे अंगात रंगीबेरंगी हाफ बाहीची टि—शर्ट व ग्रे रंगाचा लोअर पॅन्ट घातलेला एक ईसम हा एम.डी.पावडर विक्रीकरीता ग्राहकांचे शोधात उभा आहे. अशा खात्रीशीर माहितीवरून, अजनी पोलीसांनी घटनास्थळी जावून, तेथे त्यांना प्राप्त वर्णनाचा ईसम संशयीत हालचाली करतांना दिसुन आला. त्यास घेराव टाकून ताब्यात घेतले व त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने आपले नाव हिमांशु शरदराव कडू, वय २१ वर्षे, रा. कांचनगंगा सोसायटी, फ्लॅट नं. ३०३, मोंढा, के./ऑफ सचिन टाकळीकर, हिंगणा, नागपुर असे सांगीतले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यात पॅन्टचे खिश्यात एका झिपलॉक पन्नीमध्ये २.५ ग्रॅम एम.डी. पावडर मिळुन आली. आरोपीचे ताब्यातुन एम.डी. पावडर व पोको कंपनीचा ०१ मोबाईल फोन असा एकुण ३०,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्रीकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीचे कृत्य हे कलम ८(क), २२(अ) एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपीविरूध्द पोलीस ठाणे अजनी येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. शिवाजीराव राठोड अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्रीमती रश्मीता राव पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ४), मा. श्री नरेंद्र हिवरे सहा. पोलीस आयुक्त (अजनी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. नितीनचंद्र राजकुमार, सपोनि. सचिन निंबाळकर, पोउपनि. संतोष वाघमारे, पोहवा. मनोज, प्रकाश, पोअं. राहुल शेंडे, अतुल टिकले, मपोअं. रेश्मा यांनी केली.

## (गुन्हे)

## १) पोलीस ठाणे कळमणा :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

पोलीस ठाणे कळमणा हद्दीत, प्लॉट नं. १०, बम्ब्लेश्वरी नगर, भारत धवलेचे घरी किरायाने, नागपुर येथे राहणारे फिर्यादी योगेश बेनीराम भेलावे वय ३३ वर्षे हे दिनांक २०.०४.२०२६ चे १३.०० वा. ते दिनांक २३.०४.२०२६ चे १२.०० वा. चे दरम्यान, आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह बहिणीचे लग्न समारंभाकरीता गोंदीया येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरुममधील लोखंडी आलमारीतील रोख ४,७५,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ५,८०,२००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमणा येथे पोउपनि. सौरभ बुगने ९०२२१८५९१८ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

## २) पोलीस ठाणे बेलतरोडी :— घातक शस्त्रासह धुमधाम करणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक २४.०४.२०२६ चे ०९.४० वा. सुमारास, बेलतरोडी पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना श्यामनगर, मनिष नगर, हरीभाऊ कबाडी

दुकानसमोर एक ईसम हातात शस्त्र घेवुन, येणाऱ्या—जाणाऱ्या लोकांना शिवीगाळ करून, धुमधाम करतांना समक्ष दिसून आला. पोलीसांनी त्यास हटकले असता, तो पोलीसांना पाहुन पळण्याचे तयारीत असता, त्यास घेराव टाकून ताब्यात घेवून, त्यास निशस्त्र केले. पंचासमक्ष त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव मनोज मोहन साखरे, वय ३६ वर्षे, रा. कालीमाटी, तह. गोरेगाव, जि. गोंदिया, ह.मु. वैशालीनगर झोपडपट्टी, गणेश मंदीर जवळ, यादव चे घरी किरायाने, बेलतरोडी, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन एक लोखंडी चाकू किंमती अंदाजे २००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकू बाळगुन धूमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. सुमेंद्र बोपचे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे पोउपनि. नरेंद्र गिरी यांनी आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसींग)**

**१) पोलीस ठाणे सदर :—** कु. संजना पंकज तोमस्कर, वय १६ वर्षे, रा. नई बस्ती, न्यु कॉलोनी, मंगळवारी, सदर, नागपूर ही दिनांक १९.०४.२०२६ रोजी पासुन पोलीस ठाणे सदर हद्दीतुन, राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा— लांबट, बांधा— मध्यम, उंची— ५ फुट, केस— काळे लांब, अंगात— हाफ बाहीचा टी—शर्ट ऑरेंज रंगाचा व काळ्या रंगाचा जिन्स पॅन्ट घातलेले आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलते, पायात— चांदीचे पैजन व तीन बाळी कानात घातलेले आहे., ओळख— उजव्या हातावर डॉगीचे पंजे गोंदण आहे.

**२) पोलीस ठाणे यशोधरानगर :—** सौ. पियुषा निकेश पटले, वय २५ वर्षे, रा. गंगवानी सोसायटी, अवचट अपार्टमेन्ट, फ्लॅट नं. ०१, भिलगाव, यशोधरानगर, नागपूर ह्या सोबत मुलगा नामे विरल निकेश पटले, वय ०६ वर्षे व मुलगी नामे रिध्दी निकेश पटले, वय ०२ वर्षे असे दोन मुलांसह दिनांक १७.०४.२०२६ चे १०.०० वा. पासुन पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ४ फुट ३ इंच, केस— काळे लांब, भाषा— हिंदी/मराठी बोलतात.


संजना


पियुषा

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**